RNI : MHMAR/25/A0848 epaper.shikshanastra.com Shikshanastra@gmail.com 79722 12030 79722 12030

दैनिक
# शिक्षण अस्त्र

सोमवार दि. २८ सप्टेंबर २०२६ अंक ● २९८ ● ● किंमत १ रू ● ● पाने ● संपादक : संदिप नारायण ठाकरे

# राज्यात 20 हजार परीक्षा केंद्रांचे जाळे

## सीईटी, एनटीए, लोकसेवा आयोगाच्या परीक्षांसाठीही वापर

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : मुंबई : वर्षभर होणा-या विविध प्रवेश आणि स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांची दूरच्या शहरांमध्ये होणारी वणवण आता थांबणार आहे. परीक्षेसाठी पायाभूत सुविधा कायमस्वरूपी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (सीईटी सेल) 20 हजार परीक्षा केंद्रांचे जाळे उभारण्यात येणार आहे.

याचा वापर केवळ 'सीईटी' च्या परीक्षांसाठी न करता 'राष्ट्रीय परीक्षा संस्थे'च्या (एनटीए), 'महाराष्ट्र लोकसेवा आयोगा'च्या (एमपीएससी) तसेच अन्य संस्थांच्या संगणकाधारित आणि लेखी परीक्षा घेण्यासाठीही करता येईल. परीक्षा घेण्याकरिता लागणा-या पायाभूत सुविधांनी सुसज्ज अशी केंद्रे विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देता येतील. त्यातून परीक्षांमधील गैरप्रकार, गैरव्यवस्थापन यांनाही आळा घालणे शक्य होणार आहे. सध्या सीईटी सेलच्या विविध परीक्षांसाठी मोठ्या प्रमाणावर संगणकाधारित परीक्षा केंद्रांची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे एनटीएच्या जेईई, नीटसारख्या परीक्षांसह विविध भरती व पात्रता परीक्षांसाठीही केंद्रांची गरज असते.

'या संकल्पनेला मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली असून त्याबाबतचा प्रस्ताव लवकर सादर करण्याची सूचना केली आहे. सध्या राज्याच्या महसूल विभागांनुसार राज्यभर 7 हजार 200 च्या आसपास परीक्षा केंद्रे आहेत. ही संख्या 20 हजारांवर नेण्याचे उद्दिष्ट आहे.



– दिलीप सरदेसाई, आयुक्त सीईटी सेल.

या सर्व संस्थांच्या गरजा लक्षात घेऊन राज्यस्तरीय परीक्षा केंद्रांचे एक सामायिक जाळे तयार करण्याचा विचार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या 'महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण आणि विकास आयोगा'च्या (माहेड) बैठकीत सीईटी सेलचे आयुक्त दिलीप सरदेसाई यांनी ही संकल्पना मांडली. 'मुख्यमंत्र्यांनी महसूल विभागाऐवजी जिल्हा स्तरावर केंद्रे विकसित करण्याची सूचना केली. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या घराजवळचे परीक्षा केंद्र उपलब्ध करून देणे शक्य होईल,' अशी माहिती या बैठकीला उपस्थित असलेले आमदार अतुल भातखळकर यांनी दिली.

मोठ्या संख्येने उमेदवार असलेल्या परीक्षांमध्ये केंद्रांची कमतरता निर्माण झाल्यास विद्यार्थ्यांना त्यांच्या जिल्हाबाहेर अथवा दूरच्या ठिकाणी जावे लागते. प्रस्तावित कायमस्वरूपी केंद्रांच्या जाळ्यामुळे ही अडचण कमी होईल. सीईटी सेलच्या परीक्षा झाल्यानंतर त्याच केंद्रावर एनटीएच्या विविध संगणकाधारित परीक्षा, एमपीएससीच्या परीक्षा किंवा इतर शासकीय संस्थांच्या परीक्षा घेता येतील. त्यामुळे केंद्रांची उपलब्धता वाढण्याबरोबरच या केंद्रांचा वर्षभर प्रभावी वापर होऊ शकेल.

### सर्व सुविधा उपलध करून देणार

सीईटी सेलच्या प्रस्तावानुसार राज्यातील विविध भागांत परीक्षा घेण्यासाठी आवश्यक सुविधा असलेली केंद्रे निश्चित करण्यात येणार आहेत. या केंद्रे वातानुकूलित असतील. तेथे आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. या शिवाय विद्यार्थ्यांबरोबर आलेल्या पालकांची परीक्षा संपेपर्यंत थांबण्याची सोय करता येईल. त्यामुळे, एखाद्या परीक्षेसाठी नव्याने केंद्रे शोधण्याची किंवा प्रत्येक वेळी स्वतंत्र पायाभूत सुविधा उभारण्याची गरज भासणार नाही. त्याकरिता राज्य सरकारच्या ताब्यातील इमारती आणि जमिनींचा वापर करता येईल, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी केली आहे

### प्रमुख परीक्षांना फायदा

सीईटी सेलकडून वर्षभर 73 हून अधिक अभ्यासक्रमांकरिता 20 च्या प्रवेश पात्रता परीक्षा (सीईटी) घेतल्या जातात. एमपीएससीकडून गट एक, दोन, तीनच्या 10 ते 12 प्रमुख स्पर्धा परीक्षा घेतल्या जातात. एनटीएकडून वर्षभर जेईई (मुख्य), नीट, आयुष अभ्यासक्रम, सीयूईटी, एनसीईटी, नेट, सीमॅट, जीपॅट, एनआयएफटी, आयसीएआर अशा जवळपास 20 पात्रता व प्रवेश परीक्षा घेतल्या जातात.

# व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या 'डेव्हलपमेंट फी'पासून सुटका

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : पुणे : राज्यात व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना यापुढे शिक्षण शुल्कासोबतच (ट्युशन फी) स्वतंत्र विकास शुल्क (डेव्हलपमेंट फी) भरण्याची गरज भासणार नाही. शुल्क नियामक प्राधिकरणाकडून (एफआरए) निश्चित होणा-या ट्युशन फीमध्येच डेव्हलपमेंट फी समाविष्ट केली जाणार असल्याची माहिती अधिका-यांनी दिली.

'एफआरए'कडून 2026-27 या शैक्षणिक वर्षासाठी महाविद्यालयांकडून व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शुल्काचे प्रस्ताव स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू आहे. महाविद्यालयांकडून येणा-या प्रस्तावांचा विचार करून 'एफआरए'कडून अभ्यासक्रमांचे शुल्क निश्चित केले जाते. या प्रक्रियेत डेव्हलपमेंट फी ही ट्युशन फीमध्येच समाविष्ट केली जाणार आहे. इंजिनीअरिंग, वैद्यकीय, फार्मसी, मॅनेजमेंट, बीबीए, बीसीए, हॉटेल मॅनेजमेंट, आर्किटेक्चर आदी अभ्यासक्रमांना हा बदल लागू होणार आहे. त्याचप्रमाणे राखीव प्रवर्गातील मुलांची या शुल्कापासून सुटका होणार असून, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीत फायदा होणार आहे. विविध शिष्यवृत्तींचा लाभ घेणा-या मुलांसाठीही डेव्हलपमेंट फी ही ट्युशन फीमध्ये समाविष्ट होणे महत्त्वाचे ठरणार आहे. डेव्हलपमेंट फी स्वतंत्र असल्यामुळे शिष्यवृत्ती किंवा शुल्कसवलतीचा लाभ मिळूनही विद्यार्थ्यांना ही अतिरिक्त फी भरावी लागत होती. आता डेव्हलपमेंट फी ट्युशन फीचाच भाग झाल्याने शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना या रकमेचाही लाभमिळण्याची शक्यता आहे.

'डेव्हलपमेंट फी ही एकप्रकारे ट्युशन फीचा भाग असल्याने, शुल्क नियामक प्राधिकरणाने आगामी शैक्षणिक वर्षापासून केवळ ट्युशन फी विद्यार्थ्यांसाठी लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. शुल्क नियमन कायद्यात झालेल्या बदलांनुसार हा निर्णय झाला. व्यावसायिक महाविद्यालयांचे प्रस्ताव स्वीकारण्यात येत आहेत,' असे 'एफआरए'चे अध्यक्ष शेखर चन्ने यांनी सांगितले.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाने डेव्हलपमेंट फी ही ट्युशन फीमध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. मुलींना शिक्षण; तसेच परीक्षा शुल्कात 100 टक्के शुल्क सवलत आहे. आताच्या निर्णयामुळे मुलींना प्रवेश घेताना कोणतेही शुल्क भरावे लागणार नाही. मुलांना ट्युशन फीसाठी प्रवर्गनिहाय शिष्यवृत्तीचा लाभ मिळतो. त्यामुळे त्यांनाही मोठ्या प्रमाणात शुल्कदिलासा मिळणार आहे.

– चंद्रकांत पाटील, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री

### मुलींना थेट फायदा

व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या पात्र मुलींना सरकारच्या योजनांनुसार शुल्क सवलत दिली जाते. मुलींना ट्युशन फी; तसेच परीक्षा शुल्कात100 टक्के सवलत दिली जाते. त्यांना डेव्हलपमेंट फी भरावी लागत होती. मात्र, आता हे शुल्कच राहणार नसल्याने, पुढील शैक्षणिक वर्षापासून त्यांना पूर्ण शुल्कमाफीचा लाभ मिळणार आहे.

### या अभ्यासक्रमांसाठी बदल

इंजिनीअरिंग, वैद्यकीय, फार्मसी, मॅनेजमेंट, बीबीए, बीसीए, हॉटेल मॅनेजमेंट, आर्किटेक्चर, लॉ, बीएड यांसह विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना हा बदल लागू होणार आहे.

...ची संख्या 383 आहे. त्यात 95 टक्क्यांपेक्षा अधिक गुण असलेले 25 विद्यार्थी आहेत.

### शुल्क किती ?

सीईटी सेलमार्फत राबविण्यात येणा-या प्रवेश प्रक्रियेतून विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकडून ट्युशन फीच्या साधारण 10 ते 15 टक्के डेव्हलपमेंट फी आकारली जाते.

राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण शुल्क साधारण 40 हजारांपासून 12 लाखांपर्यंत आहे.

या पार्श्वभूमीवर, विद्यार्थ्यांना आता चार हजारांपासून ते एक लाख 70 हजारांपर्यंतचा शुल्क दिलासा मिळेल, असे 'एफआरए'च्या वेबसाइटवरील आकडेवारीतून स्पष्ट होते.

## भरती परीक्षा सुधारणांवर चर्चा

शिक्षण अस्त्र वृत्तसेवा : पुणे : राज्यातील भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह आणि उमेदवाराभिमुख करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेला उच्चस्तरीय टास्क फोर्स उद्या, मंगळवारी चेतना कॉलेज, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या कार्यालयाजवळ उच्चस्तरीय टास्क फोर्स साधणार संवाद संबंधित घटकांशी संवाद साधणार आहे. परीक्षा प्रक्रियेतील अडचणी, सूचना आणि अभिप्राय जाणून घेऊन त्याआधारे आवश्यक सुधारणांबाबत सरकारला शिफारशी करण्यात येणार आहेत. भरती परीक्षांशी संबंधित उमेदवार, संस्था तसेच इतर संबंधित घटकांना आपल्या सूचना व अभिप्राय टास्क फोर्सकडे कोकण विभागासाठी konkan-examreformstaskforce@maharashtra.gov.in yaa ई-मेलवर पाठविता येतील.